3 MAR 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

चर्चा, सल्ला घेण्यात दिवस सरला : 'बीसीयूडी' यांच्या सेवामुक्तीबाबत संभ्रमावस्था!

# नव्या कायद्याची अंमलबजावणी प्रक्रिया सुरु

**कोल्हापूर :** राज्यात लागू झालेल्या नवीन विद्यापीठ कायद्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया शिवाजी विद्यापीठात सुरु झाली आहे. कायदा लागू झाल्यानंतरचा विद्यापीठाचा गुरुवारचा दिवस कायदेशीर सल्ला, अन्य विद्यापीठांतील कार्यवाहीची माहिती घेणे, तेथील प्रशासनाशी चर्चा करण्यात सरला. बीसीयूडी संचालकांच्या सेवामुक्तीबाबत काहीशी संभ्रमावस्था असल्याचे प्रशासनात दिसून आले.

खुल्या अर्थव्यवस्थेची धोरणे, जागतिकीकरण, उदारीकरण या बाबी बहुतांश भारतीय सेवेत रुजू होत आहेत. त्यामुळे प्रचलित विद्यापीठे, महाविद्यालयीन शिक्षण व व्यवस्था यांचे सुयोग्य प्रशासन व नियंत्रण याबाबत अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यांचा विचार करुन डॉ. अरुण निगवेकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रचलित महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मध्ये बदल करण्याबाबत नवीन विद्यापीठ कायद्याचा मसुदा तयार केला. यात शैक्षणिक क्षेत्रातील विविध घटकांच्या सूचनांचा समावेश करुन शासनाने गेल्या तीन दिवसांपूर्वी 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६' हा नवीन कायदा लागू करण्यात येत असल्याचे राजपत्रात प्रसिद्ध केले आहे.

"

राज्य शासनाचा आदेश आणि राजपत्रातील प्रसिद्धीनुसार शिवाजी विद्यापीठाने नवीन कायद्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरु केली आहे. नव्या कायद्यातील कलम १४५, १४६ नुसार बीसीयूडी संचालकांच्या सेवामुक्तीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. या कायद्याबाबत मुंबईत आज, शुक्रवारी राज्यातील सर्व विद्यापीठांतील कुलगुरु, कुलसचिव, शिक्षणतज्ज्ञांची शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्यासमवेत बैठक होणार आहे. यात अंमलबजावणीची दिशा चांगल्या स्वरुपात स्पष्ट होईल.

\- डॉ. विलास नांदवडेकर



## कायद्याची वैशिष्ट्ये

- विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष व सचिवांचा अधिसभेमध्ये होणार समावेश
- विद्यापीठांमध्ये होणार 'लोकपाल'सारखी व्यवस्था असणारी विद्यार्थी तक्रार निवारण केंद्रे
- विद्यापीठे, महाविद्यालयांतील विविध समित्यांवर विद्यार्थ्यांचे वाढणार प्रतिनिधित्व
- विद्यार्थ्यांसाठी पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धत लागू होणार.

## आठ संचालक, चार अधिष्ठाता

नव्या कायद्यानुसार विद्यापीठात कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव आणि वित्त व लेखाधिकारी यांच्यासह आठ संचालक व चार अधिष्ठाता असणार आहेत. परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ, विद्यापीठ उपकेंद्र, ज्ञानस्रोत केंद्र, विद्यार्थी विकास, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यासाठी प्रत्येकी एक संचालक आणि विज्ञान व तंत्रज्ञान, सामजिकशास्त्रे, वाणिज्य आणि व्यवस्थापन, आंतरविद्याशाखीय यासाठी प्रत्येकी एक अधिष्ठाता असणार आहेत.

3 MAR 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पायाभूत सुविधांमुळेच सर्वसमावेशक विकास शक्य

## एस. इंद्रकांत : शिवाजी विद्यापीठ दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारताला सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी देशातील दुर्लक्षित, अविकसित व आर्थिक दृष्ट्या मागास प्रदेशाचा विकास करणे अनिवार्य आहे. त्यासाठी मूलभूत व पायाभूत सेवा-सुविधांची उपलब्धता करणे हाच एकमेव उपाय असल्याचे प्रतिपादन उस्मानिया विद्यापीठातील प्रा. डॉ. एस. इंद्रकांत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागामार्फत मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित 'सर्वसमावेशक विकास : भारत कोठे आहे' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर होते. यावेळी आर. बी. आय मुंबई कार्यालयाचे सहायक आर्थिक सल्लागार डॉ. रमेश गोलौत, प्रा. डॉ. आर. जी. दांडगे, प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, एस. टी. कोंबडे, एस. पी. पंचगल्ले आदी उपस्थित होते.

डॉ. इंद्रकांत म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा विचार केल्यास असे दिसून येते की, देशात समाधानकारक असा पायाभूत सेवा सुविधांचा विकास झाला नाही. शेती व शेती आधारित व्यवसाय, कृषी प्रक्रिया उद्योग, लघुद्योग, वित्तीय संस्था यांचा अपुरा विकास होण्यामागे पायाभूत सेवा-सुविधांची कमतरता हेच प्रमुख कारण दिसून येते.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ज्या कृषी ग्रामीण भागावर अवलंबून आहे, त्या भागाच्या विकासाबरोबरच शिक्षण, जलसिंचन, वित्तीय सेवा, वाहतूक व दळणवळण, आरोग्य सुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञान यासारख्या घटकांचाही कालानुक्रमे विकास होणे गरजेचे आहे. यामध्ये शासनाची भूमिका व त्यांची कार्ये महत्त्वाची ठरतात. त्यासाठी सरकारने पायाभूत क्षेत्राचा विकासाबरोबर अशा कल्याणकारी दृष्टिकोनातून खर्च करावा की त्यामुळे अर्थव्यवस्थेत ज्ञान, कौशल्याचे सर्वसमावेशी व विकासात्मक आंतरिक सहसंबंध तयार होतील. याशिवाय सदृढ व सशक्त भारताच्या उभारणीसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून वितरित केले जाणारे अन्नधान्य हे संख्यात्मक व गुणात्मक दृष्टीने उच्च प्रतिचे असले पाहिजे.

कुलसचिव डॉ. नांदिवडेकर यांनी सर्वसमावेशक विकासात शिक्षण व त्या आधारावर तयार होणारे शास्त्रीय संशोधन यांचे महत्त्व विषद केले. प्रास्ताविक व स्वागत अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन कविता वड्राळे यांनी केले. आभार चर्चासत्राचे संचालक व समन्वयक डॉ. विद्या कट्टी यांनी आभार मानले. चर्चासत्रास प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, अभ्यासक, विद्यार्थी उपस्थित होते.

3 MAR 2017 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Upload correct AISHE data, varsity instructs colleges

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has asked its affiliated colleges across the division to take utmost care while uploading the All India Survey on Higher Education (AISHE) data.

In a circular on February 27, it asked the colleges that the Union human resources development (HRD) ministry has showed concerns over the poor and erroneous data uploading from colleges across the country and that more authenticity and care should be taken while doing the same, it said.

The university has attached the letter from University Grants Commission (UGC) secretary Jaspal Sandhu, dated January 25, which states: "It has been informed by the HRD ministry that during 2015-16, the response of the institutions of higher education was very high and majority of institutions submitted consistent data.

"However, while scrutinising the data for 2015-16, instances of erroneous/incorrect uploading of data by some of the institutions have been observed either inadvertently or due to lack of seriousness on the part of the individual institutions in uploading the data on AISHE portal, which is matter of concern."

It further read that utmost care should be taken while uploading the data on AISHE portal in future, so that the correct data is available to the general public and also for the purpose of research and taking policy decisions.

A university official said that due to this poor uploading of the required data, the university conducts the workshop of the official concerned from each college, wherein the participants are told about the procedure and format.

The university has been regularly sending the academic data within the stipulated deadline for the respective academic year.

AISHE covers information of an educational institute on enrolment at various levels, human resources, infrastructure, income and expenditure.

3 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योग्य नियोजनातूनच यश मिळणे शक्य

## रंगनाथ नाईकडे : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात मांडले विचार

**कोल्हापूर :** आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उपवनसंरक्षक रंगनाथ नाईकडे यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे, तर रेशीम संचालनालयाचे माजी संचालक कॅप्टन डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री प्रमुख उपस्थित होते. उपवनसंरक्षक नाईकडे म्हणाले, स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचे लक्ष्य विद्यार्थ्यांनी बाळगावेच; पण त्याचबरोबर आपल्या करिअरचा प्लॅन 'बी'सुद्धा तयार ठेवावा. जेणेकरून स्पर्धा परीक्षेपेक्षाही आयुष्यात यशस्वी होणे शक्य होईल. आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात जा, नेहमी वरच्या मजल्यावर जाण्याचे नियोजन करा. आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन गांभीर्याचा असायला हवा. कॅप्टन डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्वत:ला ओळखावे. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावरच विद्यार्थ्यांना हव्या त्या क्षेत्रात यश मिळविणे शक्य आहे. यशासाठी कोणताही शॉर्टकट नसतो. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठात सेवापूर्व मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात उपवनसंरक्षक रंगनाथ नाईकडे यांनी मार्गदर्शन केले.

### नाईकडे म्हणाले...

- सध्या केंद्रीय लोकसेवा आणि राज्य सेवा यांचा अभ्यासक्रम सारखाच आहे; केवळ पॅटर्न बदलला आहे.
- अभ्यास करताना मागील दहा वर्षांतील प्रश्नपत्रिका अभ्यासाव्यात.
- चालू घडामोडींचा अभ्यास मात्र अद्ययावत करणे गरजेचे आहे.

3 MAR 2017 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पायाभूत सुविधांनीच सर्वसमावेशक विकास

## प्रा. डॉ. एस. इंद्रकांत यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात 'सर्वसमावेशक विकास' विषयावर चर्चासत्र

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारताला 'सर्वसमावेश विकास' साध्य करण्यासाठी देशातील दुर्लक्षित, अविकसीत व आर्थिकदृष्ट्या मागास प्रदेशाचा विकास करणे अनिवार्य आहे. त्यासाठी मूलभूत व पायाभूत सेवा-सुविधांची उपलब्धता करणे हाच एकमेव उपाय असल्याचे मत उस्मानिया विद्यापाठातील प्राध्यापक डॉ. एस. इंद्रकांत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागामार्फत मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित केलेल्या 'सर्वसमावेशक विकास: भारत कोठे आहे?' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर होते.



**कोल्हापूर : चर्चासत्राचे उद्घाटन करताना डावीकडून प्रा. डॉ. एस. इंद्रकांत, कुलसचिव डॉ. नांदीवडेकर, डॉ. रमेश गोलौत, प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. विद्या कट्टी.**

यावेळी आर. बी. आय. मुंबई कार्यालयाचे सहायक आर्थिक सल्लागार डॉ. रमेश गोलौत, चर्चासत्राचे संचालक व अर्थशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, समन्वयक डॉ. विद्या कट्टी, प्रा. डॉ. आर.जी. दांडगे, प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, एस. टी. कोंबडे, एस. पी. पंचगल्ले आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. इंद्रकांत म्हणाले, भारतीय स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा विचार केल्यास असे दिसून येते की, देशात समाधानकारक अशा पायाभूत सेवा सुविधांचा विकास झाला नाही. शेती व शेतीवर आधारित व्यवसाय, कृषी प्रक्रिया उद्योग, लघुयोग, वित्तीय संस्था यांचा अपुरा विकास होण्यामागे पायाभूत सेवा-सुविधांची कमतरता हेच प्रमुख कारण दिसून येते.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ज्या कृषी व्यवसायावर अवलंबून आहे, त्या भागाच्या विकासाबरोबरच शिक्षण, जलसिंचन, वित्तीय सेवा, वाहतूक व दळणवळण, आरोग्य सुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञान यासारखा घटकांचाही कालानुक्रमे विकास होणे गरजेचे आहे. यामध्ये शासनाची भूमिका व त्यांची कार्ये महत्वाची ठरतात. त्यासाठी सरकारने पायाभूत क्षेत्राचा विकासाबरोबर अशा कल्याणकारी दृष्टिकोनातून खर्च करावा की त्यामुळे अर्थव्यवस्थेत ज्ञान, कौशल्याचे सर्वसमावेशक व विकासात्मक आंतरिक सहसंबंध तयार होतील.

कुलसचिव डॉ. नांदिवडेकर यांनी सर्वसमावेशक विकासात शिक्षण व त्या आधारावर तयार होणारे शास्त्रीय संशोधन यांचे महत्व विषद केले. प्रास्ताविक डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन कविता वडाळे यांनी केले तर डॉ. कट्टी यांनी आभार मानले. चर्चासत्रास प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, अभ्यासक, विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

3 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकर मानवतेचे प्रतीक : डॉ. गुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही समाजाच्यातळागाळातीलव्यक्तीच्याविकासासाठीहोती. डॉ. आंबेडकरांना मानवतेचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. सामाजिक विषमतेतून एकतेची प्रेरणा देणारी, मानवतेची शिकवण देणाऱ्या विचारांची बैठक आंबेडकरांच्या पत्रकारितेतून अनुभवण्यास येते, असे प्रतिपादन म्हैसूर विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्याशाखा विभागाचे प्रा. डॉ. महेशचंद्र गुरू यांनी केले .

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्याशाखा व जनसंवाद अधिविभागातर्फे आयसीएसएसआर पुरस्कृत राष्ट्रीय परिषदेच्या सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानावरून डॉ. सुभाष देसाई होते. हा कार्यक्रम वनस्पतीशास्त्र विभागाच्या नीलांबरी सभागृहात झाला. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात विविध विद्यापीठांच्या संशोधक तसेच विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले.

यावेळी डॉ. एस. के. कुलकर्णी म्हणाले, ज्या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला त्या देशात आमचा जन्म झाला हेच आमचे भाग्य. बाबासाहेबांचे कर्तृत्व नेहमीच सर्वांना प्रेरणा देणारे आहे.

डॉ. सुभाष देसाई यांनीही विचार मांडले. त्यानंतर आग्रा विद्यापीठाचे वृत्तपत्र विद्याशाखेचे विभाग प्रमुख डॉ. गिरीजा शंकर, काशी विश्वविद्यालय वाराणसीचे डॉ. राम मोहन पाठक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे वृत्तपत्र विद्याशाखेचे माजी विभाग प्रमुख डॉ. वी. ल. धारूरकर यांनी मार्गदर्शन केले. कलकत्ता विद्यापीठाच्या डॉ. तपती बसू, हिमाचल प्रदेश विद्यापीठाच्या डॉ. वीर बाला आगरवाल, शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्र विद्या व जनसंवाद विभागप्रमुख डॉ. निशा मुडे- पवार, राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. वासंती रासम यांनीही मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. सुमेधा साळुंखे, चंद्रशेखर वानखेडे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

पुढारी

3 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लेखन ही सर्जनशील कला : उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे

कोल्हापूर (प्रतिनिधी) : लेखन ही एक सर्जनशील कला असून ती अभ्यासपूर्वक आत्मसात केल्यास उत्तम साहित्यिक होता येते, असे मत शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. ते दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा आणि महावीर महाविद्यालय मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त आयोजित सर्जनशील नवलेखक कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. महावीर महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे होते.

डॉ. शिंदे म्हणाले, लेखन कलेचे शिक्षण घेऊन चांगला साहित्यिक निर्माण करता येतो की नाही, याविषयी विविध मतमतांतरे आहेत. परंतु, सर्जनशील लेखनाचे अभ्यासक्रम पूर्ण करून साहित्य निर्माण झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. भाषिक सर्जनशीलता वाढवण्यासाठी उपाय योजनांवर भर दिल्यास साहित्यिक होता येते.

कथा कादंबरीची निर्मिती प्रक्रियेवर बोलताना कादंबरीकार कृष्णात खोत यांनी लिहिणाऱ्यांनी सभोवताली पाहिले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. हिमांशू स्मार्त यांनी ललित निबंधावर विचार मांडले. काव्यनिर्मिती प्रक्रियेवर कवी एकनाथ पाटील यांनी मार्गदर्शन केले. स्वागत मराठी विभागप्रमुख डॉ. गोपाळ गावडे यांनी केले.

महाराष्ट्र टाईम्स
3 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'लेखन ही सर्जनशील कला'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'भाषिक सर्जनशीलता वाढविण्यासाठी उपयोजनावर भर दिल्यास साहित्यक्षमता निर्माण होते. लेखन कला ही सर्जनशील कला आत्मसात केल्यानंतरच साहित्यिक होता येते', असे मत शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा व महावीर कॉलेजच्या मराठी विभागाच्यावतीने आयोजित मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे होते.

कांदबरीकार कृष्णात खोत म्हणाले, 'लिहिणाऱ्याने सभोवती पाहिले पाहिजे. आपल्या लेखनातून अदृश्य राजकारण व्यक्त केले पाहिजे.'

डॉ. हिमांशू स्मार्त यांनी ललित लेखन, लेखन प्रकार स्पष्ट केले. यावेळी कवी एकनाथ पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेस डॉ. शशिकांत चौधरी, डॉ. उत्तरा कुलकर्णी, प्रा. अजितकुमार चौगुले, डॉ. महादेव शिंदे, डॉ. गोमटेश्वर पाटील, गौरी भोगले, डॉ. मलगोंडा मायगोंडा, डॉ. शरद गायकवाड, डॉ. विनोद कांबळे उपस्थित होते. डॉ. गोपाळ गावडे यांनी प्रास्ताविक केले.

3 MAR 2017 तरुण भारत जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना उपवनसंरक्षक रंगनाथ नाईकडे. सोबत डावीकडून डॉ. जगन कराडे, डॉ. डी. आर. मोरे व डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री.

# नियोजनातूनच आयुष्यात यशस्वी होणे शक्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे, असे मत पुण्याचे उपवनसंरक्षक रंगनाथ नाईकडे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे होते.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्रातर्फे विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

यावेळी रंगनाथ नाईकडे म्हणाले, स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्याचे लक्ष्य विद्यार्थ्यांनी बाळगावेच, पण त्याचबरोबर आपल्या करिअरचा प्लॅन देखील तयार ठेवावा. जेणे करून स्पर्धा परीक्षेपेक्षाही आयुष्यात यशस्वी होणे शक्य होईल. आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात जा, नेहमी वरच्या मजल्यावर जाण्याचे नियोजन करा. यावेळी स्पर्धा परीक्षेची तयारी नेमकी कशी करावी, याविषयीही नाईकडे यांनी मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, सध्या केंद्रीय लोकसेवा आणि राज्य सेवा यांचा अभ्यासक्रम सारखाच आहे, केवळ पॅटर्न बदलला आहे. अभ्यास करताना मागील दहा वर्षांतील प्रश्नपत्रिका अभ्यासाव्यात. चालू घडामोडींचा अभ्यास मात्र अद्ययावत करणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

**पुण्याचे उपवनसंरक्षक रंगनाथ नाईकडे यांचे मत**

रेशीम संचालनालयाचे माजी संचालक कॅप्टन डॉ. लक्ष्मीकांत कलंत्री यांनी विद्यार्थ्यांना 'स्वत:ला ओळखण्याचा' सल्ला दिला. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावरच विद्यार्थ्यांना हव्या त्या क्षेत्रात यश मिळविणे शक्य आहे. यशासाठी कोणताही शॉर्टकट नसतो, असे त्यांनी सांगितले.

तरुण भारत
3 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विज्ञान संशोधन स्पर्धेत अजित पवारचे यश

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागातील बी. एस्सी. भाग तीन मधील विद्यार्थी अजित राजेंद्र पवार याने मराठी विज्ञान परिषदेने आयोजित केलेल्या विज्ञान संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. या स्पर्धेतील ७५ प्रकल्पांपैकी अजित पवार याच्या प्रकल्पाने प्रथम क्रमांक मिळवला. त्याने साखर कारखान्यांतील मळीवरील प्रक्रियेसंदर्भात प्रकल्प सादर केला. डॉ. सी.एच. भोसले यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्याचे अभिनंदन केले. यावेळी डॉ. भोसले यांच्यासह अधिविभाग प्रमुख डॉ. पी.एस. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.



**कोल्हापूर : अजित पवार याचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

महाराष्ट्र टाईम्स
3 MAR 2011
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आकलनातून उच्चतम साहित्य शब्दसृष्टी'

**कोल्हापूर** : 'आपल्या अवतीभवती अनुभूतीचे विश्व दडलेले आहे. माणसाची शब्दसृष्टी आणि दिव्यदृष्टी याला वाचनाची जोड देऊन योग्य आकलन केल्यास उच्चतम साहित्य निर्माण होते', असे मत शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे विभागप्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजमध्ये हिंदीत्तर भाषा हिंदी नवलेखक शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हिंदुराव पाटील होते. आठवडाभर झालेल्या शिबिरामध्ये पाच राज्यातील ४० विद्यार्थी व संशोधक प्राध्यापक सहभागी झाले होते. यावेळी प्राचार्य डॉ. पाटील, डॉ. छेदी लाल, डॉ. अनिल सिंह, डॉ. प्रीतिलता डॉ. प्रमिला सिंह यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत डॉ. आरिफ महात यांनी केले. प्रियांका सावंत, सपना जाधव यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. विश्वनाथ सुतार यांनी आभार मानले.